आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३१ मार्च २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अनेक ठिकाणी उमेदवार निश्चित, अरुणाचल विधापरिषदेच्या ६० पैकी १० जागांवर भाजपाचे १० उमेदवार बिनविरोध विजयी

- भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मेरठ इथं सभेला संबोधित करून उत्तरप्रदेशात निवडणूक प्रचाराला सुरुवात करणार / दिल्लीत रामलीला मैदानावर आज विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची महारॅली

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ज्येष्ठ भाजपा नेते आणि माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न पुरस्कार प्रदान

**आणि**

- मियामी एटीपी मास्टर्स खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या मिश्र दुहेरीत भारताचा रोहन बोपणा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एबडेन यांना विजेतेपद

**<><><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी अनेक ठिकाणी काल उमेदवार निश्चित झाले. तामिळनाडूमध्ये पहिल्या टप्प्यात एकोणचाळीस मतदारसंघांमध्ये एकंदर साडेनऊशे उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. तर आसाम मध्ये लोकसभा निवडणुकीच्या पाच जागांसाठी 35 उमेदवार रिंगणात आहेत काँग्रेस यापैकी चार ठिकाणी निवडणूक लढवत आहे. तर दिब्रुगढमध्ये काँग्रेसनं आसाम जतिया परिषदेला पाठिंबा दिला आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये, जम्मू-रियासी लोकसभा मतदारसंघातली 372 मतदान केंद्रं संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित केली गेली आहेत. तिथे कडक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जात आहेत.

<><><><><><><>

अरुणाचल प्रदेशातल्या विधानसभेच्या निवडणुकीत भाजपचे १० आमदार बिनविरोध निवडून आल्याचं काल निवडणूक आयोगानं घोषित केलं. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी निवडणूक आयोगानं हे जाहीर केलं. त्यामुळं या राज्यातली विधानसभेची निवडणूक उर्वरित ५० जागांसाठीच होणार आहे. येत्या १९ एप्रिलला होणाऱ्या विधानसभेच्या या निवडणुकीसह तिथल्या लोकसभेच्या दोन जागांची निवडणूकही होणार आहे. लोकसभेच्या दोन जागांसाठी १४ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. विधानसभेसाठी भाजपानं सर्व जागांसाठी उमेदवार उभे केले असले, तरी काँग्रेस मात्र केवळ १३ जागा लढवत आहे.

<><><><><><><>

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मेरठ इथं सभेला संबोधित करून उत्तरप्रदेशात निवडणूक प्रचाराला सुरुवात करणार आहेत. भाजपनं मेरठ इथून रामायण या गाजलेल्या मालिकेतले कलाकार अरुण गोविल यांना उमेदवारी दिली आहे. उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय लोकदलाचे अध्यक्ष जयंत चौधरी आणि भाजपचे अनेक नेते या सभेला उपस्थित असतील.

<><><><><><><>

दिल्लीत रामलीला मैदानावर आज विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीची महारॅली होणार आहे. लोकसभा निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर इंडिया आघाडीची ही पहिली मोठी सभा असणार आहे. या महारॅलीच्या माध्यमातून

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेसह अनेक मुद्यांकडे लक्ष वेधलं जाईल. मात्र त्या ही पलिकडे देशाचं संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी ही रॅली केली असल्याचं या रॅलीत सहभागी होत असलेल्या विविध पक्षांनी म्हटलं आहे. काँग्रेस आणि आम आदमी पक्षांच्या नेत्यांसह, अरविंद केजरीवाल यांच्या पत्नीही या रॅलीत सहभागी होण्याची शक्यता आहे.

दरम्यान ही रॅली संविधान वाचवण्यासाठी नाही तर काही कुटुंबांच्या संरक्षणासाठी आणि भ्रष्टाचार लपवण्यासाठी होत असल्याचा आरोप भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांनी केला आहे.

**<><><><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटानं काल बारामती मतदार संघाच्या उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली. राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटानं काल लोकसभा निवडणुकीसाठी  महाराष्ट्रातल्या पाच उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर, अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांचं नाव जाहीर केलं. यामुळे आता बारामतीत सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार आहे.

**<><><><><><><>**

महाविकास आघाडीमध्ये वंचित आघाडीला जागा देण्याबाबत कोणताही निर्णय होत नव्हता, तसंच वंचित बहुजन आघाडीचं सामर्थ्य आणि अभिमान यांनाही जागा नव्हती, त्यामुळेच आघाडीतूनबाहेर पडायचा निर्णय घेतल्याचं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज नागपूर मध्ये वार्ताहर परिषदेत सांगितलं. महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांमध्येच जागा वाटपावरून वाद आहेत, असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी भाजपच्या राजकारणावरही टीका केली. ज्या मतदार संघात महायुतीचं प्राबल्य नाही तिथे उमेदवार पळवणं, इतर पक्षांमध्ये

फोडाफोडी करणं, मनसेशी हात मिळवणं असे प्रकार भाजपा करत आसल्याचा आरोपही आंबेडकर यांनी यावेळी केला.

<><><><><><>

दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं काल न्युजक्लिक या न्यूजपोर्टलचे संस्थापक संपादक प्रबीर पुरकायस्थ यांच्याविरोधात ९ हजार पानांचं आरोपपत्र दाखल केलं. आपल्या पोर्टलवरून चीन देशाची भलामण करण्यासाठी निधी मिळवल्याचा आरोप पोलीसांनी केला आहे. या आरोपपत्रात तपासादरम्यान टाकलेल्या धाडींमध्ये जप्त केलेल्या ४८० इलेक्ट्रॉनिक उपकरणांचाही उल्लेख केला आहे. पुरकायस्थ यांनी जम्मू काश्मीर आणि अरुणाचल प्रदेश हे भारताचा भाग नसल्याचं चित्र उभं केल्याचा आरोपही पोलीसांनी केला आहे. या प्रकरणी दिल्लीच्या पटियाला हाऊस न्यायालयात येत्या १६ एप्रिलला सुनावणी होणार आहे.

<><><><><><>

दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणी सक्तवसुली संचालनालयानं दिल्लीचे वाहतूक मंत्री तसंच आम आदमी पार्टीचे नेते कैलाश गेहलोत यांची काल सुमारे ५ तास चौकशी केली. सक्तवसुली संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरं दिली असून यापुढंही आवश्यक ते सहकार्य करत राहणार असल्याचं गेहलोत यांनी या चौकशीनंतर प्रसार माध्यमांना सांगितलं.

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज ज्येष्ठ भाजपा नेते आणि माजी उपप्रधानमंत्री लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न या सर्वोच्च् नागरी सन्मानानं सन्मानित करण्यात आलं. राष्ट्रपतींनी अडवाणी यांना हा पुरस्कार त्यांच्या निवासस्थानी

जाऊन प्रदान केला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, राष्ट्रपती भवनात काल आयोजित केलेल्या समारंभात माजी प्रधानमंत्री पी व्ही नरसिंह राव यांच्यावतीनं त्यांचे चिरंजीव पीव्ही प्रभाकर राव, चौधरी चरण सिंह यांच्यावतीनं त्यांचे नातू जयंत सिंग, बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांच्यावतीनं त्यांचे चिरंजीव रामनाथ ठाकूर यांनी पुरस्कार स्वीकारला. कृषी शास्त्रज्ञ एम. एस. स्वामिनाथन यांच्यावतीने त्यांच्या कन्या नित्या राव यांनी भारतरत्न सन्मान स्वीकारला.

**<><><><><><><>**

इस्टर हा सण आज जगभरात उत्साहानं साजरा होत आहे. या सणाच्या पूर्वसंध्येला काल मध्यरात्री देशभरातल्या विविध चर्चमध्ये प्रार्थना करण्यात आली. पोप फ्रांसिस यांनीही काल सायंकाळी वॅटिकन शहरातल्या सेंट पीटर बॅसिलिका चर्च मध्ये सुमारे दोन तास सामुदायिक प्रार्थना केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देश विदेशातल्या ख्रिस्ती बांधवांना ईस्टर निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचं स्मरण म्हणून साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि सौहार्दाचं प्रतीक असल्याचं मुर्मू यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. उप-राष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही देशवासियांना शुभेच्छा दिल्या असून येशू ख्रिस्ताचं पुनरुत्थान म्हणजे प्रेम, सौहार्द तसंच क्षमाशीलतेची शिकवण देणारा प्रसंग असल्याचं म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही ईस्टर निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सणाच्या माध्यमातून राष्ट्रीय ऐक्याला तसंच शांततेला प्रेरणा मिळेल अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली आहे.

नागालँड मध्येही ईस्टर उत्साहात साजरा केला जात आहे. या राज्यातल्या विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना आयोजित केल्या जात आहेत.

<><><><><><>

हिमाचल प्रदेशाच्या उंच पर्वतीय क्षेत्रात काल नव्यानं हिमवृष्टी झाली असून लहान आणि मध्यम टेकड्यांच्या क्षेत्रात गारांचा पाऊस आणि मध्यम स्वरूपात पर्जन्य वृष्टी झाली. यामुळे राज्यात १७२ ठिकाणी रस्ते बंद झाले असून वाहतूक विस्कळीत झाली आहे. या भागात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना प्रवास करताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, काल सकाळी किन्नौर जिल्ह्यात साचलेल्या बर्फावरून राज्य परिवहन मंडळाची बस घसरली. सुदैवानं यात कोणीही जखमी झाल्याचं वृत्त नाही. राज्यात २ एप्रिल ते ४ एप्रिल या कालावधीत पर्जन्यवृष्टीची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे.

<><><><><><>

मियामी एटीपी मास्टर्स खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या मिश्र दुहेरीत भारताचा रोहन बोपणा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एबडेन यांनी विजेतेपद पटकावलं. या जोडीनं अमेरिकेचा ऑस्टिन आणि क्रोएशियाचा इव्हान या जोडीचा ६-७, ६-३, १०-६ असा पराभव केला.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. अहमदाबाद इथं दुपारी साडेतीन वाजता गुजरात टायटन्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्या पहिला सामना होईल, तर संध्याकाळी साडेसात वाजता विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपीटल्स आणि चेन्नई सुपरकिंग्ज्स यांच्यात सामना होणार आहे.

दरम्यान काल झालेल्या सामन्यात लखनऊ सुपर जाएंट्सनं पंजाब किंग्ज्सवर २१ धावांनी विजय मिळवला. विजयासाठी २०० धावांचा पाठलाग करताना पंजाब किंग्ज्सला निर्धारीत २० षटकांमध्ये ५ बाद १७८ धावाच करता आल्या.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी  १.३० वाजता

३१ मार्च २०२४ - रविवार

**<><><><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा निवडणुकीतल्या परिस्थितीचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात  वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या या पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्‌युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल. तेव्हा ऐकायला विसरू नका, उद्यापासून. संध्याकाळी सव्वा सात  ते साडे सात  च्या दरम्यान दररोज 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'.

**//<><><><><><><>//**